# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.
## आस्थापना विभाग

जा.क्र./भिनिशमना/आस्थापना/ /२०२३
दि. / /२०२३

**प्रति,**
**मा.प्रशासक तथा आयुक्त,**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

**विषय :-** **डॉ. श्रीम. विद्या शेट्टी, यांना विभागीय चौकशी अंती करण्यात आलेली शिक्षा रद्द करणेकामी सादर केलेल्या अपिल अर्जासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **१. जा.क्र./भिनिशमपा/आस्था/२८८३ दि.२१/१२/२०१० रोजीचे विभागीय चौकशीचे ज्ञापन.**
**२. जा.क्र./भिनिशमपा/आस्था/२९१८ दि. १२/१०/२०२२ चे शिक्षा आदेश.**
**३. डॉ. श्रीम. विद्या शेट्टी यांनी दाखल केलेले दि. ०९/१२/२०२२ उपायुक्त कार्या.आ.क्र.३३१२ दि. ०९/१२/२०२२ रोजीचा अपिल अर्ज.**

**मे.सविनय सादर,**

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार श्रीम.विद्या शेट्टी,स्त्री रोगतज्ञ ह्या स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय,भिवंडी येथे कार्यरत असताना दि.१८/०५/२०१० रोजी श्रीमती अफरोज जहाँ रफिक अहमद अन्सारी, हिस प्रसुतीकरीता आणले होते. दि.१९/०५/२०१० रोजी दुपारी १.३० वाजताचे सुमारास प्रसुत झाली. तथापि प्रसुती दरम्यान आया, परिचारीका, वैद्यकिय अधिकारी यांचेकडुन हलगर्जीपणा झाल्यामुळे बाळाचा मृत्यू झाला असा तक्रारी अर्ज दि.२५/०५/२०१० रोजी प्राप्त झाला. उक्त प्रकरणी हलगर्जीपणा केल्याबाबत त्यावेळी कार्यरत असणाऱ्या आया, नर्स व वैद्यकिय अधिकारी श्रीमती विद्या शेट्टी यांची महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम ८ नुसार विभागीय चौकशी करण्यात आली.

श्रीम. विद्या शेट्टी यांचेवर प्रशासनाने ठेवलेला दोषारोप सिध्द झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम ५ नुसार उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये श्रीम. विद्या शेट्टी, वैद्यकिय अधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरिता रोखुन ठेवण्यात आली. त्यांनी उक्त आदेशाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम १९ मधील ४५ दिवसांचे कालमर्यादेनुसार संदर्भ क्र.३ अन्वये दि. ०९/१२/२०२२ रोजी अपिल दाखल केले आहे. महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार सदरचे अपिल प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.

(बाळाराम जाधव)
**सहाय्यक आयुक्त प्रशासन**
**भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका**

दिनांक :- ११/१२/२०२३

प्रस्तावना

विषय :- डॉ.श्रीम.विद्या शेट्टी, स्त्री रोग तज्ञ/वैद्यकिय अधिकारी, भिवंडी नि. शहर महानगरपालिका यांनी विभागीय चौकशीच्या शिक्षा आदेशाविरुध्द सादर केलेले अपिल...

**मे.सविनय सादर,**

श्रीम.विद्या शेट्टी, स्त्री रोग तज्ञ/वैद्यकिय अधिकारी, ह्या स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय,भिवंडी येथे कार्यरत असताना दि.१८/०५/२०१० रोजी श्रीमती अफरोज जहाँ रफिक अहमद अन्सारी, हिस प्रसुतीकरीता आणले होते. दि.१९/०५/२०१० रोजी दुपारी १.३० वाजताचे सुमारास प्रसुत झाली. तथापि प्रसुती दरम्यान आया, परिचारीका, वैद्यकिय अधिकारी यांचेकडुन हलगर्जीपणा झाल्यामुळे बाळाचा मृत्यू झाला असा तक्रारी अर्ज दि.२५/०५/२०१० रोजी प्राप्त झाला. उक्त प्रकरणी हलगर्जीपणा केल्याबाबत त्यावेळी कार्यरत असणाऱ्या आया, नर्स व वैद्यकिय अधिकारी श्रीमती विद्या शेट्टी यांची महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम ८ नुसार विभागीय चौकशी करण्यात आली. श्रीम. विद्या शेट्टी यांचेवर प्रशासनाने ठेवलेला दोषारोप सिध्द झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम ५ नुसार जा.क्र./भिनिशमपा/आस्था/२९१८ दि. १२/१०/२०२२ चे शिक्षा आदेशान्वये श्रीम. विद्या शेट्टी, वैद्यकिय अधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरिता रोखुन ठेवण्यात आली. त्यांनी उक्त आदेशाविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम १९ मधील ४५ दिवसांचे कालमर्यादेच्या आत उपायुक्त कार्या./आ.क्र/ ३३१२ दि. ०९/१२/२०२२ रोजीचा अर्जान्वये शिक्षा रद्द करण्यासाठी अपिल दाखल केले आहे. व सदरचे अपिल सक्षम प्राधिकरण तथा मा. प्रशासक यांचेकडे विचारार्थ सादर करण्यासाठी प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार सदरचे अपिल प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक ३०३ दिनांक १४/१२/२०२३

श्रीम. विद्या शेट्टी यांचेवर प्रशासनाने ठेवलेला दोषारोप सिध्द झाले असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम ५ नुसार जा.क्र./भिनिशमपा/आस्था/२९१८ दि. १२/१०/२०२२ चे शिक्षा आदेशान्वये श्रीम. विद्या शेट्टी, वैद्यकिय अधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरिता रोखुन ठेवण्यात आली. उक्त आदेशाविरुध्द त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ चे (शिस्त व अपिल) नियम १९ मधील ४५ दिवसांचे कालमर्यादेच्या आत उपायुक्त कार्या./आ.क्र/ ३३१२ दि. ०९/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये शिक्षा रद्द करण्यासाठी अपिल दाखल केले आहे. **महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्रक्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१) तूरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.**

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**